# नवी मुंबई महानगरपालिका

**नस्ती क्रमांक : नमुंमपा/प्रशासन/आस्था-1/प्र.क्र.508/2058/2018**

**जाहिरात क्रमांक : 02/2018 दिनांक :- 03/09/2018**

## अग्निशमन विभागांतर्गत गट - क संवर्गातील पदभरती 2018

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागाच्या अंतर्गत गट-क संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या व पदांची शैक्षणिक अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवारांकडून विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर जाहिरात महापरीक्षा पोर्टल यांचे संकेतस्थळ **www.mahapariksha.gov.in** व नवी मुंबई महानगरपालिकेच्या **www.nmmc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास इच्छूक व जाहिरातीत नमूद अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने महापरीक्षा पोर्टल यांचे संकेतस्थळ **www.mahapariksha.gov.in** व्दारे सादर करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज स्वीकृतीचा कालावधी | दिनांक 05/09/2018 ते दिनांक 21/09/2018 (रात्री 11.59 पर्यंत) |
| 2 | उमेदवारांना त्याचे प्रोफाईलवर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक 05/10/2018 पासून परीक्षेच्या दिवसापर्यंत |
| 3 | परीक्षेचा कालावधी (संभाव्य) | दिनांक 13/10/2018 ते दिनांक 16/10/2018 |
| टीप:- परीक्षेचा निश्चित दिनांक हा महापरीक्षा पोर्टल यांचे संकेतस्थळ **www.mahapariksha.gov.in** वर प्रसिध्द करण्यात येईल. | | |

| अ.क्र. | पदनाम | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|
| 1 | विभागीय अग्निशमन अधिकारी (वेतनश्रेणी वेतन बँड रु. 9300-34800 + ग्रेड वेतन 4300) | 1 |
| 2 | अग्निशमन केंद्र अधिकारी (वेतनश्रेणी वेतन बँड रु. 9300-34800 + ग्रेड वेतन 4300) | 2 |
| 3 | अग्निशमन प्रणेता (वेतनश्रेणी वेतन बँड रु. 5200-20200 + ग्रेड वेतन 2800) | 10 |
| 4 | अग्निशामक (वेतनश्रेणी वेतन बँड रु. 5200-20200 + ग्रेड वेतन 2000) | 208 |
| 5 | वाहनचालक (अग्निशमन) (वेतनश्रेणी वेतन बँड रु. 5200-20200 + ग्रेड वेतन 2000) | 39 |

- उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्कासह भरलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रकियेच्या माहितीबाबत अदययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
- उक्त संकेतस्थळावर संगणक आधारित परीक्षेचा अभ्यासक्रम, शैक्षणिक व शारीरिक अर्हता, शारीरिक क्षमता चाचणीबाबतचे निकष, अटी-शर्ती, प्रवर्गनिहाय सामाजिक आणि समांतर आरक्षणाचा तपशील, सविस्तर जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत. अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकानंतरचे दोन दिवसापर्यंत अर्जातील माहिती सुधारित करता येईल.
- जाहिरातीमधील रिक्त पदसंख्या ही सामाजिक आरक्षणातील अनुशेष समाविष्ठ करुन नमूद केलेली आहे.
- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

ऑनलाईन अर्ज भरण्याच्या प्रक्रियेसंदर्भात मदतीसाठी उमेदवारांनी महापरीक्षा पोर्टल यांचा **टोल फ्री नंबर 180030007766** किंवा enquiry@mahapariksha.gov.in या **ईमेल आयडीव्दारे संपर्क करावा.**

ठिकाण:- सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

सही/-

**दिनांक:- 03/09/2018**

**आयुक्त तथा अध्यक्ष, कर्मचारी निवड समिती**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक-नमुंमपा/जसं/जाहिरात/799/2018